Principal Arunrao Kalode Mahavidyalaya
Session-2022-2023
Annual Report of the Department of English

| Sl No | Name of the Activity | Date | Place | Type of Activity | Level | Financed by | No of Participants |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Plantation | 19/10/2022 | College Campus | Environment | College | Dept. | 24+11+4 |
| 2. | Webinar on Stress Management | 17/11/2022 | Google Meet Platform | Faculty Development/Staff & Student Support | College | Department | 65 |
| 3 | Visit to Old Age Home | 21/11/2022 | Panchawati Old Age Home | Community Service | college | Department | 44+10+01 |
| 4 | Movie shown: Forest Man | 04/03/2023 | College Seminar Hall | Co-curricular & Environment | college | Institution | 28+05 |
| 5 | Visit to Slum | 25/03/2023 | Slum, East Nagpur | Community Service | college | Department | 31+07 |
| 6 | Visit to Anthropological Survey of India | 31/03/2023 | Anthropological Survey of India | Educational Visit | college | Department | 15+07 |
| 7. | Group Discussion On Protection of Environment | 25/04/2023 | PAK Mahavidyalaya | Co-curricular / Environment/ Student Progression( Soft Skill) | college | --------- | 23 |
| 8 | Dialogue between two Friends | 18/04/2023 & 24/04/2023 | Classroom | Co-curricular / Student Progression( Soft Skill) | college | --------- | 08 & 06 |
| 9 | Narrating an Experience | 24/04/2023 | Classroom | Co-curricular / Student Progression( Soft Skill | college | --------- | 07 |
| 10 | Certificate course on Day to Day Vocabulary for better communication | 17/08/2022 to 31/08/2022 | PAK Mahavidyalaya | Soft Skill | college | Dept. | 13 |
| 11. | Certificate course on English for Career Development | 09/01/2023 to 23/01/2023 | PAK Mahaidyalaya | Soft Skill | College | Dept. | 10 |

Co-ordinator IQAC
Principal Arunrao Kalode Mahavidyalaya
Nagpur-27

Offi. Principal
Principal Arunrao Kalode Mahavidyalaya
Omkar Nagar, Nagpur-27

Scanned with OKEN Scanner

# Principal Arunrao Kalode Mahavidyalaya

## Onkar Nagar, Nagpur

## Session-2022-2023

# Annual Report of the Internal Quality Assurance Cell

During the session2022-2023, the IQAC of the college has taken the following initiatives:

| Initiative of the IQAC | Executed/ Not Executed |
|---|---|
| Regular meetings of the IQAC | Executed |
| Framing of Academic Calendar | Executed |
| Implementation of Academic Calendar | Executed |
| Curriculum Planning | Executed |
| Innovative/ Creative methods of Teaching-Learning | Executed |
| ICT based Teaching | Executed |
| Co-curricular Activities:- visits/tours, etc. | Executed |
| Community Service | Executed |
| Faculty Development Programme | Executed |
| Parent-Teacher & Alumni Meet | Executed |
| Tests , Terminal Examinations (Even Semesters) & Final Examinations (Odd Semesters) | Executed |
| Collection of Feedback, Feedback Analysis & Action taken on the Analysis of the Feedback | Executed |
| Blood Donation Camp | Executed |
| State Level NSS Camp | Executed |
| Sports & Cultural Activities | Executed |
| Certificate Course / Add on course | Executed |
| Contribution to environment :- Cleanliness Drive & Sapling Plantation Drive | Executed |
| Organization of Poster Competition on various themes:- Scientific, Environmental, Social, etc. | Executed |
| Celebration of National Science Day | Executed |
| Participation of students in Inter-college activities | Executed |
| Research & Publication | Executed |
| Students Counselling/ Mentoring for both personal & professional development | Executed |
| Remedial Classes/ Extra Classes | Executed |
| Guest Lecture | Executed |
| Organization of Seminar on Seven Criteria of NAAC & NEP | Executed |
| Incentive Prizes given to Toppers of IV Semesters | Executed |

Co-ordinator IQAC
Principal Arunrao Kalode Mahavidyalaya
Nagpur-27

Offi. Principal
Principal Arunrao Kalode Mahavidyalaya
Omkar Nagar, Nagpur-27

Scanned with OKEN Scanner

[illegible]
[illegible] नागपूर
महिला अत्याचार निवारण समिती
2022-23

## अहवाल

शैक्षणिक सत्र 2022-23 मध्ये Women cell या समितीद्वारे खालील कार्यक्रम घेण्यात आले.

२४ जाने हा दिवस National girl child Day म्हणून साजरा करण्यात आला. आपल्या देशातील मुलींच्या समस्या आणि समाधान या विषयावर रांगोळी स्पर्धा आयोजित केली. आपल्या मुलींनी रांगोळीद्वारे संदेश देऊन आपले चित्र काढले. ही स्पर्धा 10/2/23 ला सकाळी ठीक ९.०० वाजता सुरू झाली. यात १० मुलींनी सहभाग दिला. डॉ. स्वाती ... यांनी परीक्षण करून क्रमांक दिले.

08 मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने 09 मार्चला सकाळी १०.०० वाजता महिला सबलीकरण या विषयावर परिसंवाद आयोजित केला होता. प्रमुख अतिथी म्हणून बेसा बेलतरोडी ग्रामपंचायतच्या माजी सरपंच सौ. शालिनी ... आल्या होत्या. अतिथी व्याख्यानाला 28 विद्यार्थी उपस्थित होते. त्याचप्रमाणे प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

08 मार्च ला सकाळी 11.00 वाजता G.M.C. येथून डॉक्टरांचे युनिट येऊन त्यांनी 18 वर्षाखालील मुलींचे आणि मुलांचे उंची आणि वजन घेतले. मेडिकल चेकअप करण्यात आले. यात 20 विद्यार्थ्यांनी आपले checkup करून घेतले. G.M.C. मधून डॉ. धनश्री राऊत आणि डॉ. दिव्याणी ... आणि नर्स असा स्टाफ आला होता.

कार्यक्रमाचा अहवाल प्राचार्यांच्या माहिती-करिता सादर करीत आहे.

(signature)
Mrs. B. Swain

(signature)
Mrs. S. U. Joshi
25/04/2023

Scanned with OKEN Scanner

Page ......... Date ..../..../....

# N.S.S. Programme 2022-23

| S.No. | Name of program | Date | No. of Students |
|---|---|---|---|
| 1) | Shiv Rajyabhishek Sohala | 16/06/22 | 15 |
| 2) | International Yoga Day | 21/6/22 | 14 |
| 3) | Swachhata Pakhawada | 01 to 14/08 | 27 |
| 4) | Har Ghar Tiranga Independence Day | 10/8/22 15/8/22 | 32 |
| 5) | Tree plantation | 15/8/22 | 27 |
| 6) | Samuh Rashtrageet song | 17/8/22 | 19 |
| 7) | Aadhaar card link to electrocard | 23/9/22 | 09 |
| 8) | Foundation Day of N.S.S. | 24/9/22 | 18 |
| 9) | Gandhi Jayanti | 02/10/22 | 22 |
| 10) | Shramdan | 10/10/22 | 32 |
| 11) | Constitution Day | 26/10/22 | 17 |
| 12) | National Day of Unity | 31/10/22 | 13 |
| 13) | Visit to the Panchavati Old Age home | 21/11/22 | 44 |
| 14) | Blood Donation Camp | 24/12/22 | 24 |
| 15) | National child girls Day | 24/01/23 | 10 |
| 16) | National ~~electral~~ Voters Day | 25/01/23 | 23 |
| 17) | Republic Day | 26/01/23 | 36 |
| 18) | ~~or State level~~ Special N.S.S. camp | 01 to 07 Feb 2023 | 75 |
| 19) | National Women Day | 8/3/23 | 17 |
| 20) | Visit to Slum Area | 25/3/23 | 36 |

(S. D. Joshi)

Offi. Principal
Principal ... Mahavidyalaya
Omkar Nagar, Nagpur-27

प्रिंसिपल अरुणराव कलोडे
महाविद्यालय नागपुर
सत्र - 2022-23
पर्यावरण

## अहवाल

शैक्षणिक सत्र 2022-23 यात बी.ए. आणि बी.एससी. 4th सेम यांची पर्यावरणाची लेखी परिक्षा घेण्यात आली. बी.ए. 4th सेम चे 44 विद्यार्थी आणि बी.एससी 4th सेम चे 32 विद्यार्थी परिक्षेला हजर होते. गैरहजर कोणीही नव्हते. ही परिक्षा 1H मार्चला झाली. लेखी परिक्षा ही 50 मार्क्स ची होती.

प्राचार्यांच्या माहिती करिता अहवाल सादर करत आहे.

[signature]

Mrs. S. D. Joshi

# शैक्षणिक सत्र २०२२-२०२३ मध्ये महाविद्यालयात आयोजित केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाचा
## ० वार्षिक अहवाल ०

१) १ ऑगस्ट : बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी आणि साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे जयंती :-

बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी आणि साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे १ ऑगस्ट २०२२ रोजी आदरांजलीचा कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रम सकाळी ठीक १०.०० वाजता सुरू झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. नितीन जांगितवार होते. प्राचार्यांच्या हस्ते बा. गं. टिळक आणि अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांना माल्यार्पण करून आदरांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.            तर आभारप्रदर्शन कु.            या विद्यार्थीनीने केले.

२) १५ ऑगस्ट : स्वातंत्र्य दिन :-

१५ ऑगस्ट हा स्वातंत्र्य दिन महाविद्यालयात मोठ्या आनंदाच्या व उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. सतीमाता शिक्षण संस्थेचे व साईबाबा लोकसेवा संस्थेचे सचिव मा. किशोरभाऊ उमाठे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रामुख्याने उपस्थित होते.

सकाळी ठीक ८.३० ला महाविद्यालयातून सर्वाधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यांच्या हस्ते ध्वजारोपण करण्यात आले. प्रभारी प्राचार्य डॉ. जांगितवार यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. 'स्वातंत्र्य या सर्वश्रेष्ठ मूल्याचे मोल सर्व भारतीयांनी समजून घेतले पाहिजे; आणि आपले सर्व प्रकारचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी सर्वांनी सजग राहिले पाहिजे...' असे विचार याप्रसंगी मा. किशोरभाऊ उमाठे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून व्यक्त केले.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पी. जी. मोरे यांनी केले. आभार प्रदर्शनानंतर मिठाई वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली.

Scanned with OKEN Scanner

३) संस्थापक दिन :-

साईबाबा लोकसेवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिवंगत प्राचार्य अरुणराव कल्वे यांच्या स्मृतीदिनानिमित्त दिनांक २८ ऑगस्ट २०२२ रोजी महाविद्यालयात सकाळी ठीक १०.०० वाजता 'श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. नितीन जांगीतवार होते. उपस्थित सर्व प्राध्यापकांनी व कर्मचाऱ्यांनी दिवंगत संस्थापकांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

प्राचार्य डॉ. जांगीतवार यांनी याप्रसंगी आपल्या श्रद्धांजलीपर भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मनोहर नाईक यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ. स्मिता जोशी यांनी केले. आभारप्रदर्शनाने कार्यक्रमाचा शेवट झाला.

४) ५ सप्टेंबर : शिक्षक दिन

शिक्षक दिन हा शिक्षकांचा गौरव दिन! ५ सप्टेंबर २०२२ रोजी महाविद्यालयात 'शिक्षक दिन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. नितीन जांगीतवार होते. डॉ. जांगीतवार यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी उपस्थित सर्व प्राध्यापकांना पुष्प देऊन आपला कृतज्ञताभाव व्यक्त केला. तसेच शिक्षकांप्रती आपल्या आदरभावना व्यक्त केल्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. दिपाली मेश्राम तर आभारप्रदर्शन कु. समीक्षा नासरे या विद्यार्थिनीने केले.

५) २ ऑक्टोबर : महात्मा गांधी आणि लालबहादुर शास्त्री जयंती :-

२ ऑक्टोबरला रविवार असल्यामुळे महात्मा गांधी आणि लालबहादुर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त आदरांजलीचा कार्यक्रम महाविद्यालयात दिनांक ३ ऑक्टोबर २०२२ रोजी संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य डॉ. नितीन जांगीतवार यांनी महात्मा गांधी आणि लालबहादुर शास्त्री यांच्या प्रतिमेला आदरांजली अर्पण केली.

याप्रसंगी डॉ. जांगीतवार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन

PAGE :
DATE : / /

३) १५ नोव्हेंबर : स्वातंत्र्ययोद्धा बिरसा मुंडा जयंती :

शासकीय निर्देशानुसार यावर्षी बिरसा मुंडा यांची जयंती १५ नोव्हेंबर २०२२ रोजी महाविद्यालयात 'जनजातीय गौरव दिन' म्हणून साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य डॉ. नितीन जांगितवार होते. अध्यक्षांनी बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. ऋतुजा उरकुडे या विद्यार्थिनीने केले. आभार प्रदर्शन प्रिन्स येळणे या विद्यार्थ्याने केले. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

४) ३ जानेवारी : क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले :

दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील ३ जानेवारीला क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त महाविद्यालयात आदरांजलीचा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. नितीन जांगितवार होते. डॉ. जांगितवार यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले.

याप्रसंगी प्रमुख व्याख्याते म्हणून डॉ. मनोहर नाईक यांनी विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले यांच्या क्रांतिकारी कार्यकर्तृत्वाचा परिचय करून दिला. डॉ. जांगितवार यांनी अध्यक्षीय भाषण केले. कु. समीक्षा नासरे या विद्यार्थिनीने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कु. ऋतुजा उरकुडे या विद्यार्थिनीच्या आभारप्रदर्शनाने कार्यक्रमाचे समापन झाले.

५) २६ जानेवारी : प्रजासत्ताक दिन :

प्रजासत्ताक दिन हा प्रत्येक भारतीय नागरिकाच्या संवैधानिक अधिकारप्राप्तीचा प्रारंभ दिन ! हा दिवस भारतात सर्वत्र आनंदाच्या व उत्साहाच्या वातावरणात साजरा केला जातो. दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील प्रजासत्ताक दिन महाविद्यालयात अत्यंत आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सतीमाता शिक्षण संस्थेचे व साईबाबा लोकसेवा संस्थेचे सचिव मा. किशोरभाऊ आंबे होते.

प्रजासत्ताक दिनी सर्वाधिक गुणप्राप्त विद्यार्थ्यांच्या हस्ते सकाळी ठीक ८.१५ वाजता ध्वजवंदन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक

Scanned with OKEN Scanner

PAGE :
DATE : / /

भारतीय लोकशाहीचे सजग पहारेकरी झाले पाहिजे. आणि लोकशाही मूल्य समाजजीवनात रुजविण्यासाठी कटिबद्ध असले पाहिजे' अशा स्वरूपा विचार व्यक्त केले.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पी.जी. मोरे यांनी व आभार प्रदर्शन डॉ. स्मिता जोशी यांनी केले. मिठाई वाटपाने कार्यक्रम सांगता झाली.

7) क्रीडा-सांस्कृतिक सप्ताह, स्नेहसंमेलन :-

विद्यार्थ्यांमधील कला-गुणांना वाव देण्यासाठी दरवर्षी महाविद्यालयात 'क्रीडा-सांस्कृतिक सप्ताहाचे व स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी 30 फेब्रुवारी ते 13 फेब्रुवारी २०२३ या कालावधीत विद्यार्थी 'क्रीडा-सांस्कृतिक सप्ताह' आयोजित करण्यात आला होता. क्रीडा विभागातर्फे जलद चालणे, 100 मिटर दौड, स्लो सायकलिंग, संगीत खुर्ची, लिंबू-चमच्या, क्रिकेट इत्यादी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या तर सांस्कृतिक विभागातर्फे रांगोळी स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, प्रश्नमंजुषा, अंताक्षरी, आनंद मेळावा, वर्ग सजावट इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या सर्व स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन आपल्यातील कला-गुणांचे उत्तम प्रदर्शन केले.

क्रीडा-सांस्कृतिक सप्ताहाचा समारोप स्नेहसंमेलनाने झाला. दिनांक 13 फेब्रुवारी २०२३ रोजी सतीमाता शिक्षण संस्थेचे व साईबाबा लोकसेवा संस्थेचे सचिव मा. किशोरभाऊ उमाळे यांच्या अध्यक्षतेत स्नेहसंमेलन सोहळा आयोजित करण्यात आला. स्नेहसंमेलन सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून मा. आमदार अभिजीत वंजारी प्रामुख्याने उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी 'विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच स्वतःतील कला-गुणही विकसित केले पाहिजे... कलेमुळे मनुष्य जीवनाला पूर्णत्व येते...' असा संदेश दिला. मा. किशोरभाऊ यांनी अध्यक्षीय भाषण केले. या उद्घाटन सोहळ्याचे सूत्रसंचालन डॉ. मनोहर नाईक यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. स्मिता जोशी मॅडम यांनी करून दिला. तर या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. बी. खाडे यांनी केले.

उद्घाटनानंतर विद्यार्थ्यांनी भावगीत, पोवाडा, लावणी

• मराठी विभागाचा अहवाल •
सत्र
२०२२ – २०२३

प्रति,
मा. प्रभारी प्राचार्य,
प्रिन्सिपल अरुणराव कलोडे महाविद्यालय, नागपूर
विषय :- मराठी विभागांतर्गत घेण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा अहवाल सादर करीत असल्याबाबत ...

मा. महोदय,
शैक्षणिक सत्र २०२२-२०२३ मध्ये मराठी विभागा अंतर्गत पुढील उपक्रम घेण्यात आले –

१) दिनांक १० सप्टेंबर २०२२ शनिवार रोजी सर्व विद्याशाखेतील विद्यार्थ्यांकरिता 'जयंती' हा मराठी चित्रपट दाखविण्यात आला.
२) दिनांक २१ नोव्हेंबर २०२२ सोमवार रोजी उमरेड रोड, नागपूर येथील पंचवटी वृद्धाश्रमाला विद्यार्थ्यांसह अभ्यासभेट देण्यात आली. तसेच वृद्धांना जीवन उपयोगी वस्तू भेट देण्यात आल्या.
३) दिनांक २५ मार्च २०२३ रोजी बेसा रोडच्या बाजूला कामगार वस्तीला विद्यार्थ्यांसह अभ्यासभेट दिली. तेथील मजुरांशी संवाद साधून तेथील शैक्षणिक व सामाजिक समस्या समजून घेण्यात आल्या. तसेच त्यांना जीवन उपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले.
४) दि. २०/०२/२०२३ पासून लघुकालावधी अभ्यासक्रम सुरु करण्यात आला.
५) दिनांक २३ मार्च २०२३ ~~भारत~~ सरकारच्या मानववंशशास्त्र विभागाला विद्यार्थ्यांची अभ्यासभेट घडवून आणली. विद्यार्थ्यांना तेथील उपलब्ध अवशेषांच्या, भित्तीचित्रांच्या तसेच इतर साधनांच्या द्वारे मानवी उत्क्रांती व विकासासंबंधी उद्बोधक माहिती देण्यात आली.

मराठी विभागातर्फे वरील नमूद उपक्रम 2022-23 मध्ये राबविण्यात आले. करिता आपल्या माहितीस्तव सदर अहवाल सादर करण्यात येत आहे.

मराठी विभागप्रमुख
(डॉ. मनोहर नाईक)

Offi. Principal
Principal Arunrao Kalode Mahavidyalaya
Omkar Nagar, Nagpur-27

Scanned with OKEN Scanner

सिंधिया [illegible] महाविद्यालय, नागपूर

राज्यशास्त्र विभाग

अहवाल - 2022-23

शैक्षणिक सत्र 2022-23 या कालावधीमध्ये राज्यशास्त्र विभागाने जे कार्यक्रम घेतले त्याची माहिती प्राचार्यांच्या माहितीसाठी सादर

नागपूर मध्ये हिवाळी अधिवेशन येते. राज्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांना शिवाय इतरही विभागाच्या विद्यार्थ्यांना अधिवेशन कसे असते याची माहिती मिळण्याकरिता शिवाय प्रत्यक्ष त्यांना प्रश्न उत्तर, कामकाज पाहण्याकरिता महाविद्यालयाचे 29 विद्यार्थी आणि 06 प्राध्यापक असे अधिवेशन पाहण्याकरिता दिनांक 22/12/2022 रोजी विधानभवन येथे गेले.

सामाजिक रचना समजावयास तसेच सामाजिक बांधिलकी जपण्याकरिता विद्यार्थ्यांना नागपूरातील उमरेड रोडवरील पंचवटी वृद्धाश्रमात घेऊन गेले. एकूण 46 विद्यार्थी आणि प्राध्यापक पंचवटी वृद्धाश्रमाला भेट दिली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी वृद्धांना काही भेटवस्तू दिल्या. त्यांच्याशी संवाद साधला. दिनांक 21/11/22 रोजी ही भेट झाली.

मानववंशशास्त्र या विषयाच्या म्युझियमला राज्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी दिनांक 10/03/23 ला भेट दिली. एकूण 14 विद्यार्थी यांनी म्युझियमच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधला काही प्रश्न विचारून आपल्या शंकेचे निरसन केले.

दिनांक 25/03/23 ला मानेवाडा मधील वडार समाजाच्या झोपडपट्टीला भेट दिली. 31 विद्यार्थी आणि प्राध्यापक यांनी तेथील लहान मुलांना खाण्याच्या वस्तू दिल्या त्याचप्रमाणे डेटॉल साबण आणि सॅनिटरी पॅड्स चे वाटप केले.

वरील कार्यक्रम राज्यशास्त्र विभागाद्वारे घेतल्या गेले.

(signature)

Mrs. S. D. Joshi

25/04/2023.

प्रति,
मा. प्राचार्य
प्रिंसिपाल अरुणराव कलोडे महाविद्यालय
ओंकार नगर नागपूर.

विषय - सत्र 2022-2023 चा समाजशास्त्र विभागाचा वार्षिक अहवाल

मा. महोदय,

आपणास माहितीस्तव अहवाल सादर करते की, सत्र 2022-2023 या शैक्षणिक सत्रात समाजशास्त्र विभागाच्या वतीने पंचवटी दि 21/11/22 रोजी - फुकदिवस आजी आजोबांना सोबत सत्र उद्देशाने - पंचवटी वृद्धाश्रम या दिवसाच्या उद्देशाने व वृद्ध अवस्थेतील समस्या जाणून घेण्यासाठी 'पंचवटी वृद्धाश्रम' येथे भेटीचे आयोजन करण्यात आले होते. विभागाच्या वतीने डेटाल सोप, फळ व खाऊ चे वाटप करण्यात आले. या उपक्रमात B.A- B.Com B.Sc च्या 46 विद्यार्थिनी आपला सहभाग नोंदविला होता.

तसेच दिनांक 25/03/2023 रोजी स्थानिक 'वडारसमुदाय' भेट देऊन 30 मास्क, Dettol soap, (Sanitary napkin Pad) & खाऊ चे व्यावहार बालकांना खाऊ चे वाटप करण्यात आले — या उपक्रमात 31 विद्यार्थिनी उत्साहाने सहभाग नोंदविला. हे विशेष वस्तीत समुदायाच्या सामाजिक समस्या जवळून जाणून घेणे व आपल्या मध्ये सामाजिक जाणीव रुजवणे हा या मागील उद्देश होता.

दिनांक 31/03/2023 रोजी मानववंशशास्त्र संग्रहालय, टीवी टॉवर, सिव्हिल लाईन येथे शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. समाजशास्त्र विषयाच्या अभ्यासक्रमातील विषयाच्या अनुषंगाने या संग्रहालयाला भेट देण्यात आली आहे. B.A, B.com, B.Sc च्या 26 विद्यार्थिनी आपला सहभाग नोंदविला.

* अहवाल *                दिनांक: 18/05/2023

प्रति,
मा. प्राचार्य
[illegible] महाविद्यालय,
नागपूर-27

विषय:- सत्र-2022-2023 महाविद्यालयीन परिक्षा विभागाच्या वार्षिक अहवाल सादर करण्याबाबत

महोदय,

आपल्या माहितीस्तव सत्र 2022-2023 महाविद्यालयीन परिक्षा विभागाचा अहवाल सादर करतो. की, द्वितीय सत्रातील प्रथम आणि द्वितीय सत्राच परिक्षा फेब्रुवारी व मार्च महिन्यात घेण्यात आल्या आणि द्वितीय सत्रांत परिक्षा दिनांक 26 एप्रिल 2023 ते 06/05/2023 या दरम्यान घेण्यात आली. ही परिक्षा बी.ए, बी.कॉम, एम.कॉम, बी.एससी व एम.एससी च्या सर्व विद्यार्थ्यांची घेण्यात आली. या परिक्षेकरिता महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

प्रस्तुत अहवाल आपल्या माहितीस्तव सादर.

प्रा. पी. टी. मोरे

PAGE:
DATE: / /

यांनी केले. मुख्य कार्यक्रमानंतर सर्व उपस्थितांची भोजन व्यवस्था करण्यात आली होती. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी, माजी विद्यार्थी व पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

२०) २७ फेब्रुवारी : 'मराठी भाषा गौरव दिन :

वि.वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जन्मदिनानिमित्त महाविद्यालयात 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य डॉ. नितीन जांगितवार होते. याप्रसंगी वि.वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून आदरांजली अर्पण करण्यात आली. डॉ. मनोहर नाईक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. जांगितवार यांनी अध्यक्षीय भाषण केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. सलोनी टेटे या विद्यार्थिनीने केले. आभार प्रदर्शन वसुधा गोडाणे या विद्यार्थिनीने केले.

२१) १४ एप्रिल : डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती :-

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शासकीय सुट्टी असल्यामुळे दिनांक १५ एप्रिल २०२३ रोजी महाविद्यालयात आदरांजली कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ प्राध्यापिका डॉ. बी. स्वाईन होत्या. डॉ. बी. स्वाईन आणि डॉ. स्मिता जोशी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेपुढे दीप प्रज्वलित करून प्रतिमेला माल्यार्पण केले. अभिवादन केले.

याप्रसंगी सर्व उपस्थितांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मनोहर नाईक यांनी केले. डॉ. स्मिता जोशी यांच्या आभारप्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

Co-ordinator IQAC
Principal Arunrao Kalode Mahavidyalaya
Nagpur

Offi. Principal
Principal Arunrao Kalode Mahavidyalaya
Omkar Nagar, Nagpur-27

Scanned with OKEN Scanner